# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S.(ठाणे):** मालेगांव
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0436 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**10/09/2025 01:26

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 09/09/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 09/09/2025
**Time From (वेळेपासून):** 15:13 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:27 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 10/09/2025 **Time (वेळ):** 00:47 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/09/2025 00:47 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जय गजानन उपहार गह , जुना बायपास रोड मालेगाव,मालेगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री अरविंद किसन अवचार
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 2000
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा रिधोरा,मालेगाव,मालेगांव,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा रिधोरा,मालेगाव,मालेगांव,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-7499991569

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलोसे 1 सौ. वच्छलाबाई बबन खुळे | | | 1. ग्राम रिधोरा,मालेगाव,मालेगांव, वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | बबन उर्फ भागवत सिताराम खुळे | | | 1. ग्राम रिधोरा,मालेगाव,मालेगांव, वाशिम,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

तक्रारदाराने तक्रार दिल्याने त्वरीत दाखल

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | नगदी 5000/रुपये | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद वाशिम.दिनांक:-09/09/2025.नावः- श्री. अरविंद किसन अवचार, वय -25 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. ग्राम रिधोरा, ता. मालेगांव, जि. वाशिम, मो.नं.7499991569.(जिओ) मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहत असून वडिलोपार्जीत शेती करतो. माझे नावे ग्राम मालेगांव येथील शेतशिवारात गट क्र. 310 मध्ये 04 एकर शेती आहे. दि.08/09/2025 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम कार्यालयात गेलो असता तेथे पो.नि.ए.एम. गायकवाड यांचे सोबत भेट झाली. मी सरपंच सौ. वच्छलाबाई बबन खुळे व त्यांचा नवरा श्री. बबन सिताराम खुळे यांचे विरुध्द लाच मागणी बाबत तोंडी तक्रार कथन केली असता त्यांनी तात्काळ न.प.कार्यालय वाशिम येथुन 01 व समाजकल्याण कार्यालय वाशिम येथुन 01 असे सरकारी पंच बोलावुन घेतले. मला माझी तक्रार पंचासमक्ष कथन करण्यास सांगितले असता मी दोन्ही पंचाना मी लाच मागणी बाबतची तक्रार सांगितली. त्यानंतर पो.नि.गायकवाड यांनी मला माझी तक्रार लिहुन देण्यास सांगितले असता मला वाचता येते परंतु बरोबर लिहता येत नाही याकारणाने पंच क्र 01 यांनी मी तोंडी सांगितलेली तक्रार पंच क्र 02 व पो.नि. गायकवाड यांचे समक्ष लिहली ती खालील प्रमाणे."मी अरविंद किसन अवचार, ग्राम रिधोरा येथिल मूळचा रहिवासी असून आजरोजी माझे आई व पत्नी, मुलांसह मालेगांव येथे राहतो.मालेगांव शेतशिवारात माझे नावाने गट क्र.310 मध्ये 4 एकर शेती आहे. सदर शेतीमध्ये सन 2024 मध्ये शासनाचे रोजगार हमी योजने अंतर्गत ग्राम पंचयात कार्यालय रिधोरा ,ता.मालेगांव जि. वाशिम येथुन मला माझे शेतात विहीर मंजूर झालेली आहे.सदर विहीरीचे बांधकाम पुर्ण झालेले असुन त्याचे बिल शासनाकडुन मंजुर झालेबाबतचा 1,41,308/- रुपयाचा सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शाखा मेडशी, ता. मालेगांव, जि. वाशिम येथील खाते क्र.2381231701 चा चेक क्र."038930" असलेला चेक मला आमचे गावातील सचिव ग्राम पंचायत श्री अजय कामठे यांनी दिलेला आहे. या योजने अंतर्गत सचिव ग्राम पंचायत व गावातील सरपंच यांचे जाईट बँक अकाऊन्ट असल्याने सदर विहीरीचे पैसे माझे खात्यात जमा होण्याकरीता मला सचिव ग्राम पंचायत यांनी दिलेल्या चेकवर सरपंच यांची सही असणे गरजेचे आहे सरपंच यांची सही असल्याशिवाय मला विहीर बांधकामाचा मंजुर झालेल्या निधीची रक्कम काढता येत नाही. या कारणाने सदर चेक वर सही घेण्याकरीता आमच्या गावच्या सरपंच सौ. वत्सलाबाई बबन खुळे रा. रिधोरा व त्यांचा पती बबन खूळे हे माझ्याकडे 5000/- रु. ची लाचेची मागणी करीत आहेत. 5000/-रु न दिल्यास माझे चेक वर सही करणार नाही असे त्यांचा नवरा श्री. बबन खुळे, रा. रिधोरा व सरपंच बाई मला पैशाची मागणी करीत आहेत. सदर शासकीय विहीर बांधकाम मंजुर निधीचे चेकवर सही करण्यासाठी कोणतेही पैसे दयावे लागत नाहीत याबाबत मला माहिती आहे. सदर 5000/-रु रक्कम मला लाच म्हणुन मागत आहेत. मला लाच देण्याची ईच्छा नाही. करीता लाच मागणी विरुध्द तक्रार अर्ज देत आहे. माझे अर्जासोबत विहीरीचे कागदपत्र व चेक ची झेरॉक्स प्रत देत आहे."

मी सांगितलेल्या तोंडी तक्रारीवर मी सही केली. तसेच मी सांगितलेली तोंडी तक्रार वाचुन दोन्ही पंच व समक्ष म्हणुन पो.नि.अल्का गायकवाड लाप्रवि वाशिम यांनी सहया केल्या. पोनि अलका गायकवाड लाप्रवि वाशिम यांनी मला कार्यवाही कधी व केव्हा करायची? असे विचारल्यावरुन मी त्यांना उदया दि.09.09.2025 रोजी जगदंबा देवी मंदीर नागरतास, ता. मालेगांव जि. वाशिम येथे मी कॉल केल्यावर पडताळणी कारवाई करीता येण्याच्या विनंती केली. वरुन पडताळणी कारवाई ही दि.09.09.2025 रोजी करण्याचे सर्वाणुमते ठरले. केलेल्या कार्यवाहीचा पडताळणी पुर्व पंचनामा तयार करण्यात आला.

//02//

दि.09.09.2025 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान मला, पंच क्र.01) श्री.शैलेष भिमराव चव्हाण यांचे सह सरपंच सौ. वच्छलाबाई खुळे व त्यांचा नवरा बबन खुळे दोन्ही रा. ग्राम रिधोरा, ता. मालेगांव जि.वाशिम यांची भेट घेवून त्यांची पडताळणी करणे करीता व्हाईस रेकॉर्डर लावुन पाठवून पंचासमक्ष पडताळणी केली असता, माझी सरपंच सौ. वच्छलाबाई खुळे व त्यांचा नवरा बबन खुळे यांचे सोबत त्यांचे ग्राम रिधोरा येथील राहते घरी भेट होवून बोलनी झाली. भेटी दरम्यान मी सरपंच सौ. वच्छलाबाई खुळे यांना म्हणालो की, मी काय म्हणतो त्या ग्रामसेवकानं सही केली... मी आलो तं गरबडीत आलो... तुम्हालं सांगुनही हे केलं ... सही केली त्या बुआनं...त्यावर सरपंचाचा नवरा बबन खुळे हे मला म्हटले की, "कोण, त्यावर मी सरपंच सौ. वच्छलाबाई खुळे यांना म्हणालो की, " आं.. तुम्ही मलं देउन टाका... मोकळ करा मले..मले लय झनाचे पैसे मोकळे करायचे हो... मले तोडायले लोकं..."... त्यावर सरपंच सौ. वच्छलाबाई खुळे म्हणाल्या की, "आम्हाले पण दया लागते..."... त्यावर मी म्हणालो की, " बरं जाउ दया... ति किती काय... मले काय म्हणजे मले मेळ सांगा... मले पैसे बाई...या टायमालं कुठनं पैसे..." त्यावर सरपंच सौ. वच्छलाबाई खुळे म्हणाल्या की, "पाच हजार " .. त्यावर मी म्हणालो की, " काहुन तुम्ही तेच धरुन बसले अजुन... सांगाहो..." त्यावर सरपंच सौ. वच्छलाबाई खुळे म्हणाल्या की, " पाच हजार म्हणतं.. पाच हजार ", त्यावर मी म्हणालो की, " बरं मी काय म्हणतो बाई, हातोहात देसालं का? नाही तं मी कोणाकडुन आणा लागतात मले.... माहयाकडं नाहीत पैसे, " त्यावर सरपंचाचा नवरा बबन खुळे म्हणला की, " कोणाकडुन आणा... पाच हजार आणा...तुम्ही तुमचा सही शिक्का घेउन जा... लावुन दया मी साहेबाले सांगतो ", त्यावर मी म्हणालो की, " बरं मी काय म्हणतो मले हातोहात मले सही शिक्के दया...," त्यावर सरपंच सौ. वच्छलाबाई खुळे म्हणाल्या की, " लगेच देतो हो, " त्यावर मी म्हणालो की, " म्हणजे मी लावुन देतो माहा..," त्यावर सरपंचाचा नवरा बबन खुळे म्हणला की, " आणा तुम्ही पैसे ...सही शिक्के लगेच मारुन देतो...," त्यावर मी म्हणालो की, " काही ना काही करुनं मले लगेच आणनं हेतं..," त्यावर सरपंच सौ. वच्छलाबाई खुळे म्हणाल्या की, " आणा लगेच देतो मी काही चाट नाही देत....," त्यावर मी त्यांना लाच रक्कम देण्यासाठी एक ते दीड तासाचा वेळ मागुन असे बोलणी करुन मी, पंच क्र. 01 सह जगदंबा देवी मंदीर नागरतास, ता. मालेगांव जि. वाशिम परिसर येथे परत आलो. व्हाईस रेकॉर्डर वरिल संभाषण ऐकले असता सरपंच सौ. वच्छलाबाई खुळे व त्यांचा नवरा बबन खुळे यांनी माझे नावे मंजुर असलेल्या रोजगार हमी योजना अंतर्गत मंजुर झालेल्या विहीरीचे बांधकामाचे धनादेशावर (चेक) सही देण्याकरीता 5000/- रुपये मागणी करुन ती आजच स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

सरपंच सौ. वच्छलाबाई खुळे व त्यांचा नवरा बबन खुळे यांचे आज दि.09/09/2025 रोजी सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर पो.नि.गायकवाड यांनी सरपंच सौ. वच्छलाबाई खुळे व त्यांचा नवरा बबन खुळे यांनी मागीतलेली लाच रक्कम देण्याकरीता 5000/-रु सापळा कार्यवाही करीता दोन्ही पंचासमक्ष हजर करण्यास सांगितल्याने मी माझे जवळील 500/-रु दराच्या 10 नोटा असे एकुण 5000/-रुपये पंचासमक्ष हजर केले. सापळा कारवाई सुरु करणे अगोदर पो.नि.गायकवाड यांच्या सुचने वरुन मी सरपंच सौ. वच्छलाबाई खुळे व त्यांचा नवरा बबन खुळे यांना माझे फोन वरुन फोन लावला असता त्यांनी मला पैसे घेऊन हॉटेल जय गजानन उपहार गृह, जुना बायपास रोड मालेगांव ता.मालेगांव, जि.वाशिम येथे येण्याचे सांगीतले.

त्यानंतर पो.नि.गायकवाड यांनी मला व पंच क्र.01, पंच क्र.02 यांना सापळापूर्व व सापळा पंचनाम्यामधील सुचनांची उजळणी करुन देवुन तसेच लाच रक्कम स्विकारताच मी माझे गळयातील शेला काढून हातात घ्यावा असा पुर्वनियोजित ईशारा करावा तसेच संपूर्ण सापळा पथक हॉटेल जय गजानन उपहार गृह, जुना बायपास रोड मालेगांव, ता.मालेगांव, जि.वाशिम रोड येथे आमचे आजूबाजूलाच असणार अशा महत्त्वपूर्ण सुचना देवुन माझे शर्टाचे आतील बनियानला व्हाईस रेकॉर्डर लावुन देवुन पंच क्र.01 सह सरपंच सौ. वच्छलाबाई खुळे व त्यांचा नवरा बबन खुळे यांनी त्यांचे मागणी केल्याप्रमाणे लाच रक्कमेसह देणे कामी रवाना केले.

मी व पंच क्र.01 असे हॉटेल जय गजानन उपहार गृह, जुना बायपास रोड नागपुर ते छत्रपती संभाजी नगर रोड, डही शिवार, ता.मालेगांव, जि.वाशिम रोड येथे पोहचलो असता त्याठिकाणी माझे अगोदर सापळा कारवाईचे पथक सापळा लावुन हॉटेल मध्ये बसुन असल्याचे मला दिसले. मी हॉटेल बाहेर गाडी लावुन दिली पंच क्र.01 सह

//03//

हॉटेल जय गजानन उपहार गृह येथे सरपंच खुळे बाई व त्यांचा नवरा यांची वाट पाहत बसलो. काही वेळातच सरपंच खुळे बाई व त्यांचा नवरा मी व पंच क्र.01 हॉटेलमध्ये बसून असलेल्या टेबल जवळ सरपंच येवुन बसले.मी सरपंच सौ.वच्छलाबाई खुळे यांना माझे विहिरीची फाईल दाखवून सही करण्याकरीता चेक दिला. सदर चेक वर सरपंच सौ.

वच्छलाबाई खुळे यांनी सही करुन शिक्का दिला.सरपंच सौ.वच्छलाबाई खूळे यांनी मला पैशाबाबत विचारले असता मी त्यांना माझे खिशातील 5000/-रु काढून दिले.वच्छलाबाई यांनी माझेकडुन 5000/-रु लाच रक्कम दोन्ही शासकीय पंचासमक्ष स्विकारली. सदरची लाच रक्कम सरपंच वच्छलाबाई खूळे यांनी त्यांचा नवरा बबन खुळे यांचे कडे मोजण्याकरीता व ठेवण्याकरीता दिल्यानंतर मी ठरल्याप्रमाणे माझे गळयातील शेला गळयातुन काढुन हातात घेवुन लाच रक्कम स्विकारलेबाबत पूर्व नियोजीत इशारा केला. बबन खूळे हे पैसे मोजत असतांना माझे इशा-यावरुन तात्काळ पो.नि.गायकवाड व सापळा पथक आमचे जवळ आले व सरपंच सौ. वच्छलाबाई खुळे आणि त्यांचा नवरा बबन खुळे या दोघांना 5000/रू लाच रक्कमेसह ताब्यात घेवुन त्यांच्या कडुन लाच रक्कम हस्तगत केली.तसेच सुरक्षीतता व गोपनियतेच्या दृष्टीकोणातुन पुढिल कारवाई करीता लाप्रवि कार्यालय वाशिम येथे आणण्यात आले.मी देखील त्यांचेसोबत लाप्रवि कार्यालय वाशिम येथे आलो.

ईलोसे सौ.वच्छलाबाई बबन खुळे, वय -52 वर्षे, पद-सरपंच, ग्राम पंचायत कार्यालय रिधोरा व त्यांचा नवरा बबन उर्फ भागवत सिताराम खुळे,वय -60 वर्षे, व्यवसाय-शेती दोन्ही रा. रिधोरा, ता. मालेगांव, जि. वाशिम यांनी मला माझे विहीर बांधकामाच्या मंजुर झालेल्या निधीचे रक्कमेच्या चेकवर सही व शिक्का देण्याकरीता सरपंच सौ. वत्सलाबाई बबन खुळे व त्यांचा पती बबन खूळे दोन्ही रा.रिधोरा यांनी माझ्याकडे दि.09/09/2025 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान 5000/-रुपये लाचेची स्पष्ट मागणी करून दि.09/09/2025 रोजी यशस्वी सापळा कारवाई 15.13 वा. ते 15.27 वा. 5000/- रुपये लाच रक्कम दोन्ही पंचासमक्ष स्विकारली.

याकारणाने ईलोसे 01) सौ.वच्छलाबाई बबन खुळे, वय 52-वर्षे, पद -सरपंच, ग्राम पंचायत कार्यालय रिधोरा व त्यांचा नवरा 02) बबन उर्फ भागवत सिताराम खुळे, वय 60 वर्षे, व्यवसाय शेती दोन्ही रा. रिधोरा, ता. मालेगांव, जि. वाशिम यांचे विरुध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद पोहवा राहुल व्यवहारे लाप्रवि वाशिम यांनी टंकलिखीत केली असुन मी वाचून पाहली. माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष सही

(अल्का एम गायकवाड )
पोलीस निरीक्षक,
ता.मालेगाव, ता.जि.वाशिम.
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम.

(श्री. अरविंद किसन अवचार)
रा.ग्राम रिधोरा,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANJAY NAMDEO CHOUDHARI(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
अरविंद किसन अवचार

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANJAY NAMDEO CH
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):